# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.08.2024** **वारःबुधवार**

---

1. बांग्लादेशातील अशांत परिस्थितीबाबत परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांचं संसदेत निवेदन; तिथल्या भारतीय नागरिकांशी सातत्यानं संपर्कात असल्याची ग्वाही,
2. बांग्लादेशात अडकलेल्या राज्यातल्या विद्यार्थ्यांना सुरक्षित मायदेशी आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती,
3. राज्यातील कार्यरत 3 हजार 105 विशेष शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याचा राज्य सरकारचा निर्णय, आणि
4. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये विनेश फोगट ठरली अंतिम फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय महिला कुस्तीपटू तर भालाफेक प्रकारात नीरज चोप्राचीही अंतिम फेरीत धडक.

**<u>संसद</u>**

बांग्लादेशमध्ये निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीबाबत परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी काल संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये निवेदन दिलं. बांग्लादेशातल्या अराजकाच्या परिस्थितीवर भारताचं बारकाईनं लक्ष असून तिथे असलेल्या भारतीय नागरिकांशी दूतावासाच्या माध्यमातून केंद्र सरकार सातत्यानं संपर्कात असल्याची माहिती जयशंकर यांनी दिली. सध्या बांग्लादेशात 19 हजार भारतीय नागरिक असून त्यात नऊ हजार विद्यार्थी असल्याचंही त्यांनी सांगितलं. शेख हसीना यांनी बांग्लादेशच्या पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर भारतात येण्यासाठी परवानगी मागितली होती. सोमवारी संध्याकाळी त्या दिल्लीत दाखल झाल्याचंही जयशंकर यांनी सांगितलं.

दरम्यान, लोकसभेत काल वित्त विधेयक 2024 वर चर्चा झाली. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या चर्चेत सहभाग घेत आरोग्य विम्याच्या प्रीमियमवर लावलेला जीएसटी मागे घेण्याची मागणी केली. भाजपचे निशिकांत दुबे, कॉंग्रेसचे अमर सिंह आणि दीपेंद्र हुड्डा तसंच तृणमूल कॉंग्रेसच्या महुआ मोइत्रा यांनी या चर्चेत सहभाग घेतला.

**<u>बांग्लादेश प्रश्न</u>**

बांग्लादेशातील अशांततेच्या पार्श्वभूमीवर तिथे अडकलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि मायदेशात परतीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीचे पावले उचलत काल परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाशी संपर्क साधला. बांग्लादेशातील अशांत भागात अडकलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना शक्य ती सर्व मदत करण्याची विनंती केली आहे.

बांग्लादेशात अडकलेल्या विद्यार्थ्यांची माहिती मिळविणं आणि त्यांना तातडीने मदत उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगानं सध्या बांगलादेशात असलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांची यादी संकलित करून परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाला उपलब्ध करून देण्यात आली आहे. तिथल्या परिस्थितीवर लक्ष ठेवणं आणि केंद्रीय अधिकारी आणि प्रभावित कुटुंबांशी संपर्क ठेवण्यासाठी राज्य शासनामार्फत एक पथकही स्थापन करण्यात आलं आहे. या

आव्हानात्मक काळात राज्य सरकार बाधित विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांसमवेत सक्षमपणे उभं असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं.

**<u>शिक्षक</u>**

समग्र शिक्षा अभियान आणि दिव्यांग एकात्मिक शिक्षण योजनेत 2006 पासून सेवेत असणाऱ्या 3105 विशेष शिक्षकांना सामावून घेण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल घेतला. राज्यातील केंद्र शाळेला एक विशेष शिक्षक नेमण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्र्यांनी शिक्षण विभागाला दिले. 2005 पूर्वी टप्पा अनुदानावर कार्यरत असलेल्या 26 हजार 900 शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू केल्यास येणाऱ्या आर्थिक भारासंदर्भात फेर पडताळणी करण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापनाही करण्यात आली आहे. त्यामध्ये शिक्षक आमदारांचाही समावेश आहे. या विषयासंदर्भात काल मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. शिक्षण मंत्री दीपक केसरकर, यांच्यासह विविध आमदार यावेळी उपस्थित होते.

**<u>घरोघरी तिरंगा</u>**

देशभरात 13 ते 15 ऑगस्ट दरम्यान 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा' अभियान राबविलं जाणार आहे. राज्यातही या अभियानाची पूर्ण तयारी झाली असून राज्यात सर्वत्र 9 ते 15 ऑगस्ट या कालावधीत विविध उपक्रमांच्या माध्यमातून हे अभियान साजरं केलं जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांचे तसंच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिली. केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्रालयाच्या वतीनं काल सर्व राज्यांच्या सांस्कृतिक कार्य विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत दूरस्थ माध्यमातून झालेल्या बैठकीत ते बोलत होते. प्रत्येक नागरिकानं 13 ते 15 ऑगस्ट या कालावधीत घरावर तिरंगा ध्वज फडकवावा, यासाठी त्यांना राष्ट्रध्वज उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. राज्यभरात विविध शाळा, महाविद्यालये, विविध सामाजिक संस्था, महिला बचत गट तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून हे अभियान राबविले जाणार असून गावपातळीपासून ते जिल्हापातळीपर्यंत तसेच राज्यस्तरावरही यानिमित्त फेरी, स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान, राष्ट्रध्वजासमवेत सेल्फी, प्रतिज्ञावाचन असे विविध उपक्रम घेतले जाणार असल्याची माहिती खारगे यांनी दिली.

**<u>हातमाग दिन</u>**

दहाव्या राष्ट्रीय हातमाग दिवसानिमित्त देशभरात सर्वत्र आज विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. या निमित्त नवी दिल्लीत होणाऱ्या एका विशेष कार्यक्रमात उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते संत कबीर आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे. देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासातलं हातमाग क्षेत्राचं योगदान अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी सात ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय हातमाग दिन म्हणून साजरा केला जातो.

**<u>महाराष्ट्राकडून मदत</u>**

केरळच्या वायनाड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे 30 जुलैला भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्त हानी झाली. त्याचप्रमाणे जुलै महिन्यात आसाम राज्यात पूरस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात हानी झाली. या दोन्ही राज्यांना महाराष्ट्र शासनाने प्रत्येकी 10 कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. राज्य शासनाने काल यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. केरळ आणि आसाम या राज्यांच्या मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये ही रक्कम जमा केली जाईल.

**<u>नवीन कायदे-सांगली</u>**

देशात लागू झालेल्या नवीन फौजदारी कायद्यांबाबत सामान्य नागरिक, पोलीस, वकील आणि विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, या उद्देशानं केंद्रीय संचार ब्युरो आणि सांगली जिल्हा परिषदेनं

सांगलीमध्ये कालपासून एका चित्र प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. नव्या कायद्यात अंतर्भूत केलेली नवीन कलमं, त्यांची कार्यपद्धती, ई-एफआयआर, तंत्रज्ञानाचा वापर आदी विविध विषयावरील माहिती या चित्र प्रदर्शनातून मांडण्यात आली आहे. हे प्रदर्शन उद्यापर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुलं आहे.

**<u>झिका</u>**

पुणे जिल्ह्यात झिकाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत. 20 जूनपासून पुणे जिल्ह्यात झिका विषाणूचे 73 रुग्ण आढळले असून आतापर्यंत झिकाचा संसर्ग झालेल्या चार रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाची समिती या चार रुग्णांच्या मृत्यूंचं परीक्षण करणार आहे. गेल्या तीन दिवसात पुणे शहरात आठ जणांना झिका विषाणूची लागण झाली, असं पुणे महापालिका आरोग्य अधिकारी डॉक्टर नीना बोराटे यांनी सांगितलं.

**<u>तुळजाभवानी मंदिर</u>**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानात भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या विरोधात उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गुन्हे दाखल केले नाहीत; म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती रविंद्र घुगे आणि न्यायमूर्ती वाय.जी. खोब्रागडे यांनी महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागाचा अतिरिक्त कार्यभार पाहणाऱ्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांना अवमाननेची नोटीस पाठवली आहे. त्याचप्रमाणे धाराशिव जिल्हाचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे आणि पोलीस अधीक्षक यांना प्रत्यक्ष उच्च न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. यापूर्वी न्यायालयाने दिलेले निर्देश न पाळल्यानं हिंदु जनजागृती समितीनं ही अवमानना याचिका दाखल केली होती. 1991 ते 2009 या काळात श्रीतुळजापूर मंदिर संस्थानाच्या दानपेटीच्या लिलावासंदर्भात झालेल्या भ्रष्टाचाराप्रकरणी न्यायालयानं ही नोटीस जारी केली आहे.

**<u>ऑलिम्पिक</u>**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत विनेश फोगटनं काल इतिहास रचला आणि ती ऑलिम्पिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय महिला कुस्तीपटू ठरली. तिने 50 किलो गटात क्युबाच्या युस्नेलिस गुझमन लोपेझवर 5-0 असा विजय मिळवून अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं. त्यामुळे तिला आता किमान रौप्यपदक मिळण्याची निश्चिती झाली आहे.

टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा यानं यंदाच्या पॅरिस ऑलिम्पिकच्या अंतिम फेरीत स्थान मिळवलं आहे. पात्रता फेरीत पहिल्याच प्रयत्नात 89 पूर्णांक 34 शतांश मीटर लांब भालाफेक करत नीरजनं अंतिम फेरीत आपलं नाव निश्चित केलं. हॉकीमध्ये मात्र भारताला जर्मनीच्या संघाकडून पराभव पत्करावा लागला.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात काल पावसानं विश्रांती घेतली. येत्या 24 तासात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**